8-Info-Kit-Glossary-Marathi_Print.pdf 1 04-07-2014 PM 01:04:21

# पारिभाषिक संज्ञा

| संज्ञा | अर्थ |
|---|---|
| मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी (एमटीपी)/ वौद्यकीय गर्भपात | एमटीपी कायद्याखाली येणाऱ्या अटींअंतर्गत सर्जिकल किंवा वैद्यकीय पद्धतीने पार पाडलेल्या गर्भपाताला ही संज्ञा वापरली जाते. |
| एमटीपी कायदा | हा कायदा संसदेत १९७१ साली पारित करण्यात आला आणि १९७२ मध्ये त्याची अंमलबजावणी झाली. या कायद्याअंतर्गत खालील गोष्टी स्पष्ट करण्यात आल्या आहेत:<br>• गर्भपात करू शकणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याची पात्रता<br>• गर्भपात ज्या कारणांसाठी केला जाऊ शकतो त्याची कारणे<br>• गर्भपात जिथे करता येऊ शकेल ते स्थान<br>• गर्भपात कायदेशीर असलेला गर्भावस्थेचा काळ |
| पीसी अ‍ॅण्ड पीएनडीटी (प्री कन्सेप्शन अ‍ॅण्ड प्रीनॅटल डायग्नोस्टिक टेक्निक्स) कायदा | भारतात या कायद्याअंतर्गत गर्भधारणा व प्रसूतीपूर्व लिंगनिदानाला बंदी घालण्यात आली आहे. |
| गर्भाचे वय किंवा काळ | हा गर्भावस्थेचा कालावधी आहे आणि तो पाळीच्या पहिल्या दिवसापासून मोजण्यात येतो. तो सर्वसामान्यपणे आठवड्यांमध्ये मोजला जातो. भारतात वैद्यकीय गर्भपात गर्भावस्थेच्या विसाव्या आठवड्यापर्यंत करता येतो. |
| पहिल्या तिमाहीतील एमटीपी | २० आठवड्यांचा कालावधी सर्वसाधारणपणे दोन टप्प्यांमध्ये विभागला आहे. त्याला गर्भावस्थेच्या परिपक्वतेबाबत विविध वैद्यकीय गरजा कारणीभूत आहेत. गर्भावस्थेच्या १२ व्या आठवड्यापर्यंत गर्भपात करण्यात आल्यास त्याला पहिल्या तिमाहीतील एमटीपी म्हटले जाते. |
| दुसऱ्या तिमाहीतील एमटीपी | १२-२० आठवड्यांच्या काळात गर्भपात होणे. दुसऱ्या तिमाहीतील गर्भपातासाठी दोन डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असते. |
| एलएमपी | याला लास्ट मॅन्युस्ट्रल पीरियड असे म्हटले जाते. हा अत्यंत महत्त्वाचा आहे कारण गर्भावस्थेचा काळ मागील पाळीच्या पहिल्या दिवसापासून मोजला जातो. |
| प्रोडक्ट्स ऑफ कन्सेप्शन (पीओसी) | हा प्रेग्नन्सी टिश्यू मास आहे. गर्भपाताच्या काळात तो काढून टाकला जातो. हा टिश्यू पाहिल्यावर आपल्याला गर्भावस्थेचा सरासरी काळ कळू शकतो. |
| भ्रूण | गर्भधारणा झाल्यावर आठव्या आठवड्यापासून गर्भातील मानवी विकासाचा टप्पा (फलनापाठोपाठ) आणि जन्मानंतर संपणारे. |
| एमटीपीची पद्धत | सर्जिकल- सर्जिकल साधनांद्वारे गर्भपात केला जातो त्यासाठी व्हॅक्युम अ‍ॅस्पायरेशन किंवा मेकॅनिकल इव्हॅक्युएशन केले जाते.<br>वैद्यकीय- गर्भपात करण्यासाठी औषधांचा वापर केला जातो. |
| गर्भपाताच्या सर्जिकल पद्धती | डिलटेशन अ‍ॅण्ड क्युरेटेज (डीॲण्डसी)- डायलाटेशन म्हणजे सर्व्हायकल कॅनलचा विस्तार (गर्भाकडे खुला होणारा) आहे आणि क्युरेटेज म्हणजे गर्भाची भिंत घासून काढणे. या प्रक्रियेमध्ये गर्भाला विविध साधनांच्या मदतीने ज्यांना डायलेटर्स म्हणतात त्यांनी डायलेट करणे आणि त्यानंतर कॅन्सेप्शनचे घटक क्युरेट या धारदार साधनाच्या मदतीने घासून काढले जातात. गर्भाच्या डायलेशनमुळे मोठे क्युरेट गर्भात शिरण्यासाठी आवश्यक असते. ही एक अत्यंत वेदनादायी आणि वेळखाऊ प्रक्रिया आहे. गर्भपातामुळे त्यात अनेक गुंतागुंती होण्याची शक्यता व्हॅक्युम अ‍ॅस्पायरेशन किंवा गर्भपाताच्या वैद्यकीय पद्धतींच्या तुलनेत जास्त आहे. डी अ‍ॅण्ड सी ही एक सर्जिकल गर्भपाताची एक पूर्ण प्रक्रिया असून ती व्हॅक्युम अ‍ॅस्पायरेशन आणि/किंवा गर्भपाताच्या वैद्यकीय पद्धतींनी केली पाहिजे. (डब्ल्यूएचओ २०१२)<br>व्हॅक्युम अ‍ॅस्पायरेशन- या पद्धतीमध्ये गर्भपात एका व्हॅक्युम किंवा निगेटिव दबाव स्त्रोताद्वारे गर्भधारणेचे घटक बाहेर काढून केला जातो.<br>इलेक्ट्रिक- यात व्हॅक्युम सक्शन मशीनने निर्माण केला जातो आणि काढून टाकण्याच्या पद्धतीला इलेक्ट्रिक व्हॅक्युम अ‍ॅस्पायरेशन (इव्हीए) किंवा सक्शन इव्हॅक्युएशन (एसई) म्हटले जाते.<br>मानवी- येथे व्हॅक्युम हातात धरलेल्या सीरिंजच्या मदतीने निर्माण केला जातो आणि गर्भपिशवी रिकामे करण्याच्या या प्रक्रियेला (एमव्हीए) असे म्हटले जाते.<br>डी अ‍ॅण्ड ई (डायलेशन आणि इव्हॅक्युएशन)- ही एक जेनेरिक संज्ञा आहे जिचा वापर गर्भपातासाठी केला जातो. येथे गर्भ पिशवी मेटल/प्लास्टिक डायलेटर्सने डायलेट केला जातो आणि त्यानंतर हे व्हॅक्युम सोर्स किंवा सर्जिकल साधनांनी रिकामे केले जाते. |

8-Info-Kit-Glossary-Marathi_Print.pdf 2 04-07-2014 PM 01:04:22

# पारिभाषिक संज्ञा

| संज्ञा | अर्थ |
|---|---|
| ॲबॉर्शनच्या वैद्यकीय पद्धती (एमएमए) | ही औषधाच्या मदतीने गर्भपात करण्याची पद्धत आहे. भारतात मान्यताप्राप्त असलेली दोन औषधे खालीलप्रमाणे:<br>• मिफेप्रिस्टोन (आरयू ४८६)<br>• मिसोप्रोस्टोन<br>• भारतात औषधांचा वापर (मिफेप्रिस्टोन आणि मिसोप्रोस्टोन) गर्भपातांसाठी नऊ आठवड्यांपर्यंत करता येतो.<br>मिफेप्रिस्टोन (आरयू ४८६)- प्रोजेस्टरोन हा एक असा हार्मोन आहे जो गर्भाच्या वाढीसाठी आवश्यक आहे. या औषधात ॲन्टी प्रोजेस्टरोन घटक आहे. त्यामुळे गर्भाची वाढ थांबवली जाते. वैद्यकीय गर्भपाताची प्रक्रिया या औषधाद्वारे सुरू होते.<br>मिसोप्रोस्टोल- या औषधाचा वापर गर्भाशय मऊ करण्यासाठी केला जातो. त्यामुळे ते सहजपणे प्रसारण पावते. या औषधामुळे गर्भाशय आक्रसायलाही मदत होते. गर्भाशय मऊ झाल्यामुळे आणि गर्भाशयाचे स्नायू आकसले गेल्यामुळे गर्भाशयातील घटक काढून टाकण्यास मदत होते. |
| आपत्कालीन गर्भनिरोधन | आपत्कालीन गर्भनिरोधन किंवा लैंगिक संबंधांनंतरचे निरोधन म्हणजे गर्भनिरोधनाची अशी पद्धत ज्यातून लैंगिक संबंध आल्यानंतरच्या पहिल्या काही दिवसांमध्ये गर्भधारणा रोखली जाऊ शकते. असुरक्षित लैंगिक संबंधांनंतर किंवा गर्भनिरोधक अपयशी ठरल्यावर किंवा गैरवापर केल्यावर (जसे विसरलेल्या गोळ्या किंवा फाटलेला कंडोम), बलात्कार किंवा सक्तीचा संभोग झाल्यावर आपत्कालीन वापर करण्यासाठी त्याचा उपयोग होतो. |
| आपत्कालीन गर्भनिरोधनाच्या पद्धती | • इमर्जन्सी कॉन्ट्रासेप्शन पिल्स (ईसीपी)- जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशींनुसार भारताच्या औषध महानियंत्रकांनी लिव्होनोर्जेस्ट्रेलचा वापर ईसीपी म्हणून करण्यास परवानगी दिली आहे. भारत सरकारच्या मान्यताप्राप्त मार्गदर्शक तत्वांमुळे असुरक्षित लैंगिक संबंध आल्यावर सात तासांच्या आत ईसीपी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. हे उत्पादन बाजारात उपलब्ध आहे. त्यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय सेवाकर्त्यांच्या प्रिस्क्रिप्शनची गरज भासत नाही.<br>• कॉपर बेअरिंग इन्ट्रायुटेरिन डिव्हाइसेस (आययूसीडीज)- एक आययूसीडीचा वापर आपत्कालीन गर्भनिरोधन म्हणून असुरक्षित लैंगिक संबंधांनंतर सात दिवसांच्या आत वापरण्यात आल्यास केला जाऊ शकतो. त्यामुळे हे एक एका चालू अत्यंत प्रभावशाली गर्भनिरोधन पद्धतीची गरज असलेल्या स्त्रीला वरदान ठरते. |
| ईसीपी (इमेर्जेन्सी कॉन्ट्रासेप्टीव पिल) आणि एमएमएमधील फरक | ईसीपी ही असुरक्षित संभोगानंतर गर्भधारणा टाळण्यासाठीची एक पद्धत असून त्यातून फलन किंवा बीजांडे रोवण्याची प्रक्रिया टाळली जाते. हे बाजारात सहजगत्या उपलब्ध असलेले औषध अतून त्याचा वापर असुरक्षित संभोगानंतर ७२ तासांच्या आत गर्भावस्था टाळण्यासाठी केला जातो. त्याचवेळी एमएमए हा गर्भपात करण्याची पद्धत असून नोंदणीकृत वैद्यकीय सेवाकर्त्यांकडून योग्य प्रिस्क्रिप्शनवर याची औषधे वापरली जाऊ शकता. |
| सुरक्षित गर्भपात | कौशल्यपूर्ण व्यक्तीकडून आवश्यक ती सर्व वैद्यकीय साधने सरकारकडून मान्यताप्राप्त केंद्रावर गर्भपात करण्याची प्रक्रिया |
| अपूर्ण गर्भपात | गर्भपाताच्या प्रक्रियेद्वारे भ्रूणाचा पूर्ण भाग किंवा घटक पूर्णपणे काढून टाकता आला नाही तर त्याला अपूर्ण गर्भपात असे म्हणतात. |
| प्रेरित गर्भपात | एखाद्या स्त्रीने आपला गर्भपात एका सेवाकर्त्याकडून स्वेच्छेने करून घेतल्यास त्यास प्रेरित गर्भपात म्हटले जाते. |
| मिस्ड ॲबॉर्शन | ही गर्भावस्थेची अशी अवस्था आहे जिथे भ्रूण वाढायचे थांबते व त्याची वाढ पूर्ण होत नाही. अशा वेळी गर्भपात करणे अत्यावश्यक असते. |
| तात्काळ गर्भपात | कोणत्याही बाहेरच्या हस्तक्षेपाविना गर्भपाताची प्रक्रिया आपोआप सुरू होते. |
| सेप्टिक ॲबॉर्शन | वरील कोणत्याही प्रकारचा गर्भपात संसर्गाशी संबंधित असेल तर त्याला सेप्टिक ॲबॉर्शन असे म्हणतात. |
| मेन्स्ट्रुअल रेग्युलेशन | ही प्रक्रिया एका स्त्रीची मासिक पाळी कोणत्याही कारणाशिवाय चुकली असेल (गर्भावस्था आणि इतर) तर ती पुन्हा सुरू करण्यासाठी किंवा नियमित करण्यासाठी केली जाते. ती पाळी चुकल्यानंतर पहिल्या १५ दिवसांमध्ये केली जाते आणि १९७० साली जेव्हा गर्भावस्थेचा पहिला टप्पा ओळखण्यासाठी संवेदनशील लघवी तपासणी उपलब्ध नव्हती तेव्हा ती खूप प्रचलित होती. ती एमआर सीरिंजच्या मदतीने केली जात होती. तो युटेराइन घटक काढून टाकण्यासाठी मानवी स्त्रोत आहे. |
| असुरक्षित गर्भपात | कोणत्याही प्रकारचे कौशल्य किंवा प्रशिक्षण नसलेल्या व्यक्तीकडून गर्भपात केला गेल्यास किवा किमान वैद्यकीय दर्जा नसलेल्या ठिकाणी किंवा अशा वातावरणात केला गेल्यास त्यास असुरक्षित गर्भपात असे म्हटले जाते. |